


# मानवलोक समाजकार्य महाविद्यालय

अंबाजोगाई, जि. बीड

पर्व २३

## डॉ. द्वारकादासजी लोहिया (बाबुजी)

# स्मृती व्याख्यानमाला

मानवलोक ग्रामीण विकासाच्या उपक्रमात १९८२ पासून पाणलोट, शेती, आरोग्य, शिक्षण, वृध्द, महिला इ. घटकांच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. संस्थेचे संस्थापक सचिव **डॉ.द्वारकादासजी लोहिया (बाबुजी)** यांच्या स्मृती प्रित्यर्थ दि.०७.०९.२०२१ (जयंती) ते २३.११.२०२१ (पुण्यतिथी) या कालावधीत विविध सामाजिक प्रश्नावर सुरु असलेल्या अनेक नव्या प्रयोगांची माहिती देण्याकरिता व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे.

दिव्यांग समाजातील अत्यंत दुर्लक्षित क्षेत्र आहे दिव्यांगाचे दोन तीन प्रकार सोडले तर इतर प्रकाराची माहिती फारशी कोणाला नाही. स्वमग्रता हा असाच दूर्लक्षित व माहित नसलेला एक प्रकार. अशा दूर्लक्षित, उपेक्षित व अत्यंत गुंतागुंतीची मानसिक स्थिती असणाऱ्या स्वमग्न दिव्यांग प्रकारावर गेल्या दशकापासून आरंभ ही संस्था कार्यरत आहे. जी मुले आपल्याच विश्वात आणि विचारात रममाण असतात, जे संवेदनाचे अर्थ लावू शकत नाहीत, प्रतिक्रिया देऊ शकत नाहीत, अशा मुलांच्या भावना समजून घेऊन त्यांना दैनंदिन कामे शिकण्याचा, वेगवेगळ्या कौशल्याचा वापर करून त्यांना आनंदी करण्याचे अनेक नवीन प्रयोग यशस्वी करून मुले आणि त्याच्या पालकांना आशेचा किरण दाखवणाऱ्या **'आरंभ'** ची वाटचाल, नाविन्यपूर्ण प्रयोग आणि अनुभव समजून घेण्यासाठी मानवलोक समाजकार्य महाविद्यालयाने **दिनांक २५ सप्टेंबर २०२१** रोजी व्याख्यानाचे आयोजन केले आहे तरी सर्वांनी सहभागी व्हावे ही विनंती.

-: प्रमुख मार्गदर्शक :-



## मा.अंबिका टाकळकर

'आरंभ', औरंगाबाद

**विषय : दिव्यांग-स्वमग्न व गतिमंद मुलांचे सामाजिक समायोजन एक आव्हान**

**दिनांक :** २५ सप्टेंबर २०२१
शनिवार,
**वेळ :** सकाळी ११.०० वा.

**थेट प्रसारण स्थळ :**
facebook LIVE
Manavlok Ambajogai
https://www.facebook.com/manavlokambajogai/live

-: विनित :-

| प्रा. डॉ. रमा पांडे | डॉ. प्रकाश जाधव | श्री.अनिकेत लोहिया |
|---|---|---|
| समन्वयक | प्राचार्य | कार्यवाह |
| प्राध्यापक, मानवलोक समाजकार्य महाविद्यालय, अंबाजोगाई | मानवलोक समाजकार्य महाविद्यालय, अंबाजोगाई | मानवलोक, अंबाजोगाई |

Coordinator IQAC
Manavlok's College of Social Work
Ambajogai Dist. Beed -431517

Principal
Manavlok's Collage Of Social Sciences
Ambajogai Dist. Beed

# Webinar No- 04

| | |
|---|---|
| **Title** | Social adjustment of autistic children a challenge |
| **Resource Person** | Smt. Ambika Takalkar, Aarham Sanstha, Aurangabad |
| **Date** | 25/09/2021 |
| **Coordinator** | Dr. Rama Pande |

On 25.09.2021, a discussion was held with Smt. Ambika Takalkar, Director and Founder Member of Aramba Sanstha, Aurangabad, on the topic "Social adjustment of autistic children is a challenge".

Arambam is the first organization autistic children in Marathwada which was started in Aurangabad in 2011. Special teachers through innovative experiments and therapy to teach self-absorbed children their daily activities and using different skills to keep them happy, how to get parental response, solving challenges and problems of working with sensitive, marginalized and neglected subjects, with the help of all the self-absorbed children and Mrs. Ambika Takalkar gave detailed guidance on how they are bringing happiness to their parents' lives.

He asserted that early diagnosis and early intervention are very important to overcome this problem. Dr. Rama Pande as the coordinator of this program. Work was done under the guidance of Prakash Jadhav. On this occasion, 65 professors, students, representatives of institutions participated online.

R. A. Pande
Coordinator IQAC
Manavlok's College of Social Work,
Ambajogai Dist. Beed -431517

Principal
Manavlok's College of Social Work
Ambajogai Dist. Beed 431517

# सूचना

दि. २२.०९.२०२१

एम.एस.डब्ल्यू. प्रथम व द्वितीय वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, मानवलोकचे संस्थापक डॉ. द्वारकादासजी लोहिया (बाबुजी) यांच्या स्मृती समारोह दि. ०७.०९.२०२१ ते २३.११.२०२१ या दरम्यान विविध विषयावर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने दि. २५.०९.२०२१ रोजी सकाळी ११:०० वा. मानवलोक समाजकार्य महाविद्यालयाच्या वतीने **"दिव्यांग–स्वमग्न व गतीमंद मुलांचे सामाजिक समायोजन एक आव्हान"** या विषयावर ऑनलाईन वेबीनारचे आयोजन करण्यात आले आहे. या विषयावर मा. अंबिका टाकळकर, आरंभ, औरंगाबाद हया मार्गदर्शन करणार आहेत. सर्व विद्यार्थ्यांनी सदरील वेबीनारला उपस्थित रहाणे अनिवार्य आहे.

प्राचार्य

Principal
Manavlok's Collage Of Social Sciences
Ambajogai Dist. Beed

Coordinator IQAC
Manavlok's College of Social Work
Ambajogai Dist. Beed -431517

विषय : दिव्यांग–स्वमग्न व गतिमंद मुलांचे सामाजिक समायोजन एक आव्हान

साधन व्यक्ती : श्रीमती अंबिका टाकळकर, आरंभ संस्था, औरंगाबाद

दिनांक : २५.०९.२०२१, शनिवार सकाळी ११:००

दिनांक २५.०९.२०२१ रोजी " दिव्यांग–स्वमग्न व गतिमंद मुलांचे सामाजिक समायोजन एक आव्हान" या विषयावर आरंभ संस्था, औरंगाबादच्या संचालक व संस्थापक सदस्य श्रीमती अंबिका टाकळकर यांच्याशी संवाद साधण्यात आला.

आरंभ ही संस्था २०११ साली औरंगाबाद येथे सुरू करण्यात आलेली मराठवाडयातील स्वमग्न मुलांची पहिली संस्था आहे. विशेष शिक्षक नवनवीन प्रयोग व थेरपीच्या माध्यमातून स्वमग्न मुलांना त्यांचे दैनंदिन कामे शिकवण्याचा व वेगवेगळया कौशल्यांचा वापर करून त्यांना कसे आनंदी ठेवले जाते, पालकांचा प्रतिसाद कसा मिळतो, अशा संवेदनशील, उपेक्षित व दुर्लक्षित विषयावर काम करताना येणाऱ्या आव्हाने व समस्यांचे निराकरण करत, सर्वांच्या मदतीने स्वमग्न मुलांच्या व त्यांच्या पालकांच्या आयुष्यात आनंद कसे आणत आहेत याबद्दल श्रीमती अंबिका टाकळकर यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

शिघ्र निदान व शिघ्र हस्तक्षेप हे या समस्येवर मात करण्यास अत्यंत महत्वाचे आहे असे त्यांनी प्रतिपादन केले. प्रा. रमा पांडे यांनी या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्राचार्य डॉ. प्रकाश जाधव यांच्या मार्गदर्शनाने काम पाहिले. यावेळी ऑनलाईन ६५ प्राध्यापक, विद्यार्थी, संस्था प्रतिनिधी सहभागी झाले होते.

Coordinator IQAC
Manavlok's College of Social Work
Ambajogai Dist. Beed -431517

Principal
Manavlok's Collage Of Social Sciences
Ambajogai Dist. Beed